# समिती दर्पण

ऑगस्ट २०२५

विद्यार्थी साहाय्यक समिती : दूरध्वनी : ०२०-२५५३३६३१, मोबाईल : ९४०४८५५५३०
ईमेल : info@samiti.org, वेबसाईट : www.samiti.org


## समितीविषयी...

ग्रामीण भागातील हजारो विद्यार्थ्यांच्या जीवनात परिवर्तन घडविणारी संस्था आणि युवा परिवर्तनाचे केंद्र म्हणून विद्यार्थी साहाय्यक समितीच्या कामाकडे पहावे लागेल. गुणवत्ता आहे, परंतु पैशांअभावी शहरात येऊन उच्च शिक्षण घेता येत नाही, अशा विद्यार्थ्यांसाठी पुण्यात अतिशय माफक दरात राहण्याची आणि जेवणाची सोय उपलब्ध करून द्यावी, या हेतूने डॉ. अच्युतराव आपटे, स्वातंत्र्य सेनानी हरिभाऊ फाटक, सुमित्राताई केरकर आदींनी सन १९५५ मध्ये समितीची स्थापना केली. पाच विद्यार्थ्यांची वेगवेगळ्या घरी वाराने जेवणाची सोय करण्यापासून कामाला सुरुवात झाली. आज समितीची पुण्यात सात आणि नगरमध्ये एक अशी आठ वसतिगृहे आहेत. त्यात १२०० हून अधिक विद्यार्थी -विद्यार्थिनींची निवास-भोजनाची व्यवस्था तर आहेच, शिवाय त्यांच्या व्यक्तिमत्व विकासासाठी उपक्रम राबविले जात आहेत. स्वच्छता, समता आणि श्रमप्रतिष्ठा या त्रिसूत्रीवर समितीचे काम चालते.

# जागतिक भरारीसाठी ग्रामीण युवकांना नवे पंख

## नवीन शैक्षणिक धोरणानुसार कॉर्पोरेट व उद्योजकीय कौशल्यांवर भर





### विद्यार्थी विकास केंद्र

**विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास हे विद्यार्थी साहाय्यक समितीचे ध्येय ज्या माध्यमातून साध्य करता येते, ते म्हणजे विद्यार्थी विकास केंद्र. विद्यार्थ्यांमधील कौशल्यांचा विकास करून उद्योजकतेचा विचार त्यांच्या मनात पेरणारे हे केंद्र. केंद्रातर्फे राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांचा यंदा सुनियोजित कृतिबद्ध आराखडा तयार करण्यात आला आहे, त्याविषयी...**

डॉ. ज्योती गोगटे

विद्यार्थी साहाय्यक समिती ही फक्त निवास आणि भोजन पुरविणारी संस्था नाही, तर ग्रामीण विद्यार्थ्यांच्या संपूर्ण विकासाचे केंद्र आहे. गेल्या अनेक वर्षांपासून, ग्रामीण महाराष्ट्र तसेच इतर भागांतील हजारो विद्यार्थी, आपल्या गावाचे आणि कुटुंबाचे स्वप्न घेऊन, उच्च शिक्षणासाठी पुण्यात येतात आणि समितीच्या वसतिगृहांमध्ये राहतात. हे विद्यार्थी प्रामुख्याने आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांतील असतात. अनेक जण पदवीधर होणारे कुटुंबातील पहिले असतात. त्यांच्याकडे उच्च गुणवत्ता आणि मोठी स्वप्ने असतात, परंतु खेडेगावातून शहरात आल्यानंतर नव्या वातावरणाशी जुळवून घेणे, आधुनिक संधी आणि स्पर्धेला सामोरे जाणे, हे एक मोठे आव्हान ठरते.

विद्यार्थी साहाय्यक समितीच्या मार्गदर्शनाखाली, हे विद्यार्थी फक्त शैक्षणिकदृष्ट्या सक्षम होत नाहीत, तर आत्मविश्वासाने परिपूर्ण, कौशल्यसंपन्न आणि जबाबदार नागरिक म्हणून समाजात जाण्यास तयार होतात.

### विद्यार्थी समृद्धी केंद्र (Student Enrichment Centre)

या वर्षी समितीने आपल्या कार्याचा मोठा टप्पा पार केला आहे. पुण्यातील समितीची स्वतःची सात वसतिगृहे, अहिल्यानगर येथे दोन शाखा आणि महिला सेवा मंडळाचे चालवायला घेतलेले एक वसतिगृह अशा एकूण १० वसतिगृहांमध्ये जवळपास १,३०० विद्यार्थी सध्या राहतात. हे आता फक्त वसतिगृहांचे जाळे नाही, तर लहानसे गुरुकुल झाले आहे, जेथे विद्यार्थी राहतात, शिकतात, कौशल्ये आत्मसात करतात आणि विकसित होतात

### केंद्राचा ७ महिन्यांचा कार्यक्रम

- **४ महिने अनिवार्य सत्रे :** जीवनकौशल्ये, संवादकौशल्ये, व्यक्तिमत्त्व विकास, करिअर सज्जता
- **३ महिने ऐच्छिक पूरक अभ्यासक्रम :** आवडीनुसार कौशल्य विकास

### मुख्य उपक्रम

विद्यार्थी साहाय्यक समिती विविध उपक्रमांद्वारे विद्यार्थ्यांचा संपूर्ण विकास साधण्यावर भर देते. या उपक्रमांमध्ये शैक्षणिक, व्यावसायिक, उद्योजकीय तसेच जीवन कौशल्यांचा समावेश आहे.

**१. मूलभूत कौशल्ये (Foundation Skills)**

विद्यार्थ्यांमध्ये संवादकौशल्य, इंग्रजी प्रावीण्य, डिजिटल साक्षरता, वेळ व्यवस्थापन, टीमवर्क, नेतृत्व यांचा विकास करण्यावर लक्ष केंद्रित केले जाते. मुलींसाठी सेल्फ डिफेन्ससारख्या कौशल्यांचा समावेशही केला जातो. या उपक्रमामुळे विद्यार्थी स्वत:ची ओळख, आत्मविश्वास व सामाजिक समावेश साधतात.

**२. कॉर्पोरेट रेडीनेस (Corporate Readiness)**

विद्यार्थ्यांना रिझ्युमे लेखन, मुलाखत तयारी, आचारसंहिता, समस्या निराकरण, क्रिटिकल थिंकिंग, डेटा व डिजिटल टूल्स शिकविले जातात. यामुळे त्यांना करिअरच्या संधींसाठी तयारी, व्यावसायिक दृष्टिकोन व निर्णयक्षमता प्राप्त होते.

**३. उद्योजकीय कौशल्ये (Entrepreneurial Skills)**

विद्यार्थ्यांना व्यवसाय कल्पना, मार्केट रिसर्च, स्टार्टअप ओळख, Earn & Learn प्रकल्प यांचे प्रशिक्षण दिले जाते. या उपक्रमांमुळे विद्यार्थी नवोपक्रम, व्यवसाय मॉडेल तयार करणे व आर्थिक स्वावलंबन शिकतात.

**४. अनुभवाधारित शिक्षण (Experiential Learning)**

विद्यार्थ्यांना उद्योगभेटी, इंटर्नशिप, समाजाभिमुख प्रकल्प, स्टार्टअप क्लब्स आणि मेंटॉरशिप नेटवर्क यामध्ये सहभाग देण्यात येतो. यामुळे त्यांना प्रत्यक्ष अनुभव, व्यावसायिक जाळे आणि सामाजिक जबाबदारीची जाण प्राप्त होते.

**५. जीवन कौशल्ये व सर्वांगीण विकास (Life Skills & Holistic Development)**

विद्यार्थ्यांची नैतिकता, जबाबदारी, मानसिक स्वास्थ्य, बहुविषयकता, लवचिकता, क्रीडा व सांस्कृतिक उपक्रम यावर भर दिला जातो. या उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास होतो. ते सामाजिक समज आणि जीवन कौशल्ये मिळवितात.

### एकत्रित धोरण

या सर्व उपक्रमांनी विद्यार्थ्यांना शैक्षणिक, व्यावसायिक, उद्योजकीय आणि जीवन कौशल्यांचा संतुलित विकास साधण्याची संधी दिली जाते. विद्यार्थी आवडीच्या पूरक अभ्यासक्रमांची निवड, उद्योग अनुभव, स्टार्टअप प्रकल्प व सांस्कृतिक उपक्रम यांमध्ये सहभागी होऊ शकतात.

### टप्प्याटप्प्याने विकास

**१. पहिले वर्ष– शहरी जीवन व जीवनकौशल्ये**

शहराची ओळख, वसतिगृह, डिजिटल पेमेंट, सोशल मीडिया, आत्मजाणीव, भावनिक सक्षमता, अभ्यास पद्धती, MS Office, Canva, AI, इकिगाई, SMART Goals, क्लब्स, कमवा आणि शिका, विदेशी भाषा, 6 Sigma, मुलींसाठी सेल्फ डिफेन्स

**२. दुसरे वर्ष– करिअर जागरूकता व तयारी**

SWOT, करिअर लॅडर, इंटर्नशिप, सार्वजनिक संवाद, ई-मेल शिष्टाचार, व्यावसायिक लेखन, रिझ्युमे, लिंक्डइन, GD सराव, नेतृत्व, टीमवर्क, उद्योजकता प्रकल्प

**३. तिसरे- चौथे वर्ष– प्लेसमेंट व करिअर/ व्यवसाय तयारी**

ग्रोथ माइंडसेट, कौशल्य मॅपिंग, उद्योग संशोधन, प्रोजेक्ट

पान ३ वर ►

# जागतिक उद्योजकता परिषदेत समिती प्रतिनिधींचा सहभाग

## परदेशातील मराठी उद्योजकांना दिली कार्याची माहिती



दुबईमध्ये १६ ते १८ ऑगस्ट दरम्यान झालेल्या जागतिक उद्योजकता परिषदेत विद्यार्थी साहाय्यक समितीने सहभाग नोंदविला. समितीचे अध्यक्ष प्रतापराव पवार, कार्यकारी विश्वस्त तुषार रंजनकर, विश्वस्त डॉ. ज्योती गोगटे, सहाय्य संकलन समितीचे अध्यक्ष प्रदीप मांडके आणि मुख्य विकास अधिकारी चंद्रकांत कुलकर्णी यात सहभागी होते.

या तीन दिवसीय परिषदेत समितीच्या प्रतिनिधींनी सामाजिक संस्था म्हणून समिती करीत असलेल्या कार्याची माहिती दिली. परिषदेतील अनेक मराठी उद्योजक समितीशी परिचित आहेत. अनेक जण या निमित्ताने नव्याने जोडले गेले आणि या कार्याला सहकार्य करण्याचे आश्वासन त्यांनी दिले.

गरजू आणि होतकरू विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी मिळाली, तर त्यांचा आणि पर्यायाने समाजाचा विकास होणे शक्य आहे, अशा भावना यावेळी व्यक्त करण्यात आल्या. परदेशातील मराठी उद्योजकांनी पुण्यात आल्यावर समितीला भेट देऊन आवश्यक ते सहकार्य करण्याचे आश्वासन यावेळी दिले.

ही परिषद यशस्वी होण्यासाठी समितीचे हितचिंतक, देणगीदार आणि उद्योजक विनोद जाधव यांनी पुढाकार घेतला. समितीचे दुबईतील माजी विद्यार्थी विजय कदम, रवींद्र देशमुख यांचा परिषदेच्या संयोजनात मोलाचा वाटा होता. हरीश पाटणकर, ओंकार वाघमारे या माजी विद्यार्थ्यांनी या ठिकाणी सहकार्य केले.

# ट्रॅव्हल अँड टूरिझममध्ये 'फोर स्टार'ची 'कीर्ती'

## तयाचा वेलू...



कीर्ती हासे

स्त्रिया कितीही कर्तृत्ववान असल्या, तरी त्यांचे कुटुंब त्यांच्यासाठी किती महत्त्वाचे असते, याचा खूप वेळा अनुभव येतो. समितीच्या माजी विद्यार्थिनी कीर्ती हासे या त्यापैकीच एक. 'फोर स्टार ट्रॅव्हल्स'च्या सर्वेसर्वा. ट्रॅव्हल बिझनेसमध्ये असूनही five किंवा seven star असे नाव का नाही, या प्रश्नावर त्या म्हणतात, माझे पती, दोन मुली आणि मी असे आमचे चौघांचे कुटुंब म्हणून 'Four Star' हे नाव.

पासपोर्ट, व्हिसा, तिकिट बुकिंग, ट्रॅव्हल इन्शुरन्स, फॉरेन एक्सचेंज, कार, बस बुकिंग आणि आता ग्रुप टूर्ससुद्धा... असे सगळे काम कीर्ती यांची कंपनी करते. कोणत्याही कामाला नाही म्हणायचे नाही, हे त्यांचे तत्त्व. येत नसेल तर नवी संधी समजून ते शिकून घ्यायचे. म्हणूनच त्या काही दिवस इस्टेट एजंट म्हणून सुद्धा काम करीत होत्या. तसेच कोरोना काळात त्यांचे काम ठप्प झाले होते, तेव्हा त्या Zomato delivery सुद्धा करायच्या!!

कीर्तीताई सांगतात, "तुमच्या मनात प्रवासाचा विचार आल्यापासून तो प्रवास पूर्ण होईपर्यंत मी पूर्ण जबाबदारी घेते. तुम्ही कोणत्याही वेळी फोन करा, तो उचलला जाणार आणि तुमचे काम होणार, ही खात्री मी माझ्या ग्राहकांना देते. हेच माझे वेगळेपण आहे. त्यामुळे माझ्या एजन्सीकडून प्रवासाला गेलेला ग्राहक तर परत माझ्याकडेच येतो आणि इतर चार जणांना आमचे नाव सुचवितो."

कीर्ती हासे यांचे गाव अहिल्यानगर जिल्ह्यातील संगमनेरजवळील चिकणी. त्या सांगतात, या गावाने आयुष्याची त्रिसूत्री दिली... चि म्हणजे चिकाटी, क म्हणजे कष्ट आणि नि म्हणजे निष्ठा. कीर्तीताईंची आई विडी कामगार, वडील शेतकरी. त्यांना एक भाऊ आणि एक बहीण. कीर्ती यांचे दहावीपर्यंतचे शिक्षण गावीच झाले. दहावीनंतर तीन वर्षांचा travel and tourism चा diploma केला तो विद्यार्थी साहाय्यक समितीमध्ये राहून. त्या म्हणतात, समिती तसेच संगीता गारवे मॅडम, मनीषा गोसावी मॅडम ह्यांचे उपकार मी कधीच विसरणार नाही. पुण्यात उभे राहण्याचे बळ मला त्यांच्याकडून मिळाले. कोरोनानंतर जेव्हा माझा व्यवसाय थंडावला होता, तेव्हा सन २०२३ मध्ये मला समितीकडून उद्योजकता पुरस्कार मिळाला आणि त्यातून पुन्हा व्यवसाय सुरू करण्याची शक्तीही! कोरोनाचा काळ आणि जेट एअरवेज कंपनी अचानकपणे बंद पडणे, या मोठ्या संकटांना कीर्ती यांच्या ट्रॅव्हल एजन्सीने तोंड दिले. मात्र हार न मानता, न डगमगता तोच व्यवसाय त्यांनी तितक्याच जोशात सुरू ठेवला.

ट्रॅव्हल अँड टुरिझम या क्षेत्रातील करिअरच्या सुरुवातीला कीर्ती यांनी BTW Visa services या कंपनीमधे नोकरी केली. तेथे अनुभव घेऊन स्वतःचा व्यवसाय त्यांना सुरू करायचा होता. मात्र मुख्य प्रश्न होता इंग्रजी संभाषणाचा. त्यातून त्यांनी कॉम्प्युटर कधीच हाताळलेला नव्हता. त्या कंपनीतील वरीष्ठ सहकारी आशिष लघाटे यांनी सांगितलेल्या सगळ्या सूचना त्या लिहून घ्यायच्या आणि नंतर डमी अकाउंट बनवून सराव करायच्या. त्यातून त्या शिकत गेल्या.

दरम्यान लग्न झाल्यानंतर संसार, मुलांच्या जबाबदाऱ्या वाढल्याने नोकरी जमेना. दरम्यानच्या काळात त्यांनी पदवी मिळविली होती. स्वतःचा व्यवसाय उभा करायचा होता. त्यांची कामाची पद्धत, निष्ठा पाहून BTW चे श्री. दीप भोंग यांनी त्यांना मदत केली. कीर्ती यांनी सुरुवातीला स्वतःच्या गावात घरातूनच व्यवसायाला सुरुवात केली. ओळखीतून काम मिळायचे, इतर कोणीच येत नव्हते. म्हणून पिंपरी चिंचवड भागात टेबल स्पेस घेऊन ऑफीस सुरू केले. मग मात्र धडाक्यात बुकिंग्ज सुरू झाली. जम बसत असतानाच कोरोना आला आणि व्यवसाय थंडावला. परंतु त्या डगमगल्या नाहीत. कोणतीच गोष्ट गृहीत धरायची नाही, हा धडा त्या अनुभवातून शिकल्या.

सध्या त्यांच्याकडे मदतनीस म्हणून ग्रामीण भागातील दोन मुले काम करतात. स्वतःचा व्यवसाय सांभाळून कीर्तीताई एका पंधरा महिलांच्या बचत गटाच्या अध्यक्ष म्हणूनही कार्यरत आहेत. त्या म्हणतात, मी कधीच टॉपर, अभ्यासू मुलगी नव्हते. पुस्तकातील अभ्यासातून काहीच मिळत नाही. त्यामुळे कायम पास होण्यापुरताच अभ्यास केला. ते सुद्धा समितीमध्ये राहायला मिळावे म्हणून..! पण त्या काळात 'कमवा- शिका' योजनेत खूप काम केले. वेगवेगळी माणसे भेटली, त्यातून मी घडले"

**(शब्दांकन : माधवी कुलकर्णी)**

# यशस्वी होण्यासाठी कल्पक, ध्येयवादी व्हा

## डॉ. भावेश भाटिया यांचा स्वातंत्र्य दिनी विद्यार्थ्यांना सल्ला



'जीवनात यशस्वी होण्यासाठी कल्पक, ध्येयवादी व प्रयत्नशील राहण्याची गरज आहे. आयुष्यात यश साध्य करायचे असेल, तर फक्त स्वप्न पाहू नका; ती पूर्ण करण्याच्या दिशेने वाटचाल करीत राहा,' असा सल्ला सनराईज कँडल्स अँड ओशोनिक व्हिजन फॉर ब्लाइंड वेल्फेअर सोसायटीचे संस्थापक डॉ. भावेश भाटिया यांनी विद्यार्थ्यांना दिला. विद्यार्थी साहाय्यक समितीमध्ये स्वातंत्र्य दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात डॉ. भाटिया प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. मुलींच्या नवीन वसतिगृहात झालेल्या कार्यक्रमात डॉ. भाटिया यांच्या पत्नी नीता, समितीचे कार्यकारी विश्वस्त तुषार रंजनकर, विश्वस्त तुकाराम गायकवाड, पद्माकर जोगदंड, दिनकर वैद्य, चंद्रकांत कुलकर्णी यांच्यासह समितीचे पदाधिकारी, कार्यकर्ते, विद्यार्थी, माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरवात देशभक्तीपर गीते आणि 'ऑपरेशन सिंदूर'वरील नाटिकेने झाली. संघर्षपूर्ण वाटचाल करीत यशस्वी उद्योजक झालेले प्रज्ञाचक्षू डॉ. भावेश भाटिया यांनी आपला प्रवास विद्यार्थ्यांसमोर उलगडला. यशस्वी उद्योजकाबरोबरच गिर्यारोहक, क्रीडापटू, सायकलपटू म्हणून भाटिया यांची उल्लेखनीय कामगिरी ऐकून उपस्थित प्रभावित झाले. या प्रवासात पत्नी नीता यांची मोलाची साथ लाभल्याचे त्यांनी सांगितले.

समिती आज एवढ्या मोठ्या प्रमाणावर विद्यार्थी घडविण्याचे काम करीत आहे. ही एक प्रकारे देशसेवाच आहे, अशा शब्दांत डॉ. भाटिया यांनी समितीच्या कार्याचे कौतुक केले.

तुषार रंजनकर यांनी प्रास्ताविक केले. यावेळी समितीचे हितचिंतक पद्माकर जावडेकर यांच्या परिवाराकडून ओंकार शिंदे, मानसी जाधव या दोन विद्यार्थ्यांना उत्तम विद्यार्थी पुरस्कार देऊन सन्मानित केले. समितीतील विद्यार्थ्यांनी देणगी स्वरूपात काही रक्कम जमा करून ती डॉ. भाटिया यांच्या संस्थेला दिली. ओंकार शिंदे व पर्णवी म्हस्के यांनी सूत्रसंचालन केले. सानिका खामणकर हिने आभार मानले. दरम्यान, डॉ. आपटे वसतिगृहात कर्नल दीनानाथ सिंग, सुमित्रा सदनमध्ये विनया ठोंबरे, लजपत भवनमध्ये श्रीधर कुलकर्णी यांच्या हस्ते झेंडावंदन झाले.

> मेणबत्ती बनविण्याचा व्यवसाय करताना माणसे जोडली. रेल्वे प्लॅटफॉर्म, बस स्टँडवर अनेक दिव्यांग, दृष्टिहीन बांधव भीक मागताना दिसतात. त्यांना रोजगार उपलब्ध करून देत त्यांचे जीवन बदलण्याचा प्रयत्न सुरू आहे.
> - **डॉ. भावेश भाटिया,** उद्योजक

> पुरस्काराने मला केवळ शाब्बासकी दिली नाही तर, जबाबदारी वाढविली आहे. समितीने दाखविलेला विश्वास, मार्गदर्शन तसेच आयुष्यातील सर्वांत कठीण, तसेच चांगल्या काळात माझ्या पाठीशी उभे राहिल्याबद्दल आभार. मिळालेल्या शिष्यवृत्तीमुळे माझ्या पदवीच्या शिक्षणात मोठी मदत होणार आहे.
> - **मानसी जाधव,** उत्तम विद्यार्थिनी पुरस्कार विजेती

> समितीने आजपर्यंत मला फक्त शिक्षणामध्ये मदत केली नाही, तर आयुष्यभराचे संस्कार दिले. व्यवस्थापनामध्ये काम करण्याची, नेतृत्व करण्याची संधी, शिक्षणासाठी प्रोत्साहन दिले. पुरस्कारामुळे जबाबदारी वाढली आहे. समितीने दिलेली शिकवण न विसरता यापुढेही मी चांगली वर्तणूक ठेवेन.
> **ओंकार शिंदे,** उत्तम विद्यार्थी पुरस्कार विजेता

# अभियांत्रिकीतील बदलांची विद्यार्थ्यांना मिळाली माहिती

## 'अ‍ॅक्सेंचर'चे व्यवस्थापकीय संचालक शैलेश कुलकर्णी यांचे मार्गदर्शन

ग्रामीण भागातून आलो, हा न्यूनगंड न बाळगता संवाद कौशल्य, व्यक्तिमत्त्व विकास, सादरीकरण कौशल्य, चिकित्सक विचार, याबरोबरच तांत्रिक कौशल्ये आत्मसात करा. तुम्ही शिक्षण काय घेतले, यापेक्षा ते व्यवहारात वापरता येते का, हे महत्त्वाचे आहे. समितीच्या उपक्रमांचा लाभ घ्या, असा सल्ला अ‍ॅक्सेंचर कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक शैलेश कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांना दिला.

मुलींच्या नवीन वसतिगृहात झालेल्या सत्रात श्री. कुलकर्णी यांनी समितीतील इंजिनीअरिंग डिग्री आणि डिप्लोमाच्या विद्यार्थी-विद्यार्थिनींना मार्गदर्शन केले. यावेळी कायम विश्वस्त तुकाराम गायकवाड, कार्यकारी विश्वस्त तुषार रंजनकर, विश्वस्त डॉ. ज्योती गोगटे, मुख्य विकास अधिकारी चंद्रकांत कुलकर्णी उपस्थित होते.

वसतिगृहात जीवनशिक्षण मिळते, असे सांगत श्री. कुलकर्णी यांनी माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील बदलती परिस्थिती, तंत्रज्ञान, कंपन्यांच्या अपेक्षा याविषयी विद्यार्थ्यांची संवाद साधला.





# 'मोबाईल व्यसनमुक्ती' पुस्तकाचे प्रकाशन

विद्यार्थी साहाय्यक समितीचे कार्यकारी विश्वस्त तुषार रंजनकर व माजी विद्यार्थी नवनाथ जगताप लिखित, रुद्र प्रकाशनातर्फे प्रकाशित 'मोबाईल व्यसनमुक्ती' या पुस्तकाचे प्रकाशन ५ ऑगस्टला प्रसिद्ध लेखक व वक्ते अच्युत गोडबोले व समितीचे अध्यक्ष प्रतापराव पवार यांच्या हस्ते झाले. समितीच्या लजपत संकुलात झालेल्या या कार्यक्रमाला समितीचे कायम विश्वस्त डॉ. भाऊसाहेब जाधव, सी. ई. पोतनीस, सामाजिक कार्यकर्ते यजुवेंद्र महाजन, प्रदीप गारटकर यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. 'मोबाईल हे मूलतः संवादाचे माध्यम होते. मात्र, तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे त्यातील संवाद हरपून अन्य गोष्टी मानवी मेंदूला वेडे करू पाहत आहेत. मोबाईलचा गरजेपुरता वापर केला, तर आपल्या जगण्याला पूरक असे साधन आहे. मात्र, त्याचा अतिवापर माणसाला अधोगतीकडे घेऊन जाणारा आहे,' असे प्रतिपादन अच्युत गोडबोले यांनी यावेळी केले.

प्रतापराव पवार म्हणाले, 'तुमचे चारित्र्य मोबाईल नव्हे, तर स्वतः तुम्ही घडवत असता. त्यामुळे स्वतःला समृद्ध करण्यासाठी इतर अनेक पर्यायांचा योग्य वापर करा.'

नात्यांमध्ये दुरावा निर्माण होण्याचे कारण मोबाईलच असल्याचे यजुर्वेंद्र महाजन यांनी सांगितले. तुषार रंजनकर यांनी मोबाईल, इंटरनेटच्या विळख्यातून समाजाला बाहेर काढण्याची गरज अधोरेखित केली. मेंदूवर थेट परिणाम करणाऱ्या मोबाईलच्या व्यसनाला आपण गांभीर्याने घ्यायला हवे, असे नवनाथ जगताप यांनी नमूद केले. पर्णवी म्हस्के, सुप्रिया केळवकर यांनी सूत्रसंचालन केले व आभार मानले.

# मिळाला कला, संस्कृती, जीवनमूल्यांचा नवा दृष्टिकोन

## गणेशोत्सवानिमित्त ज्ञानसत्रात नामांकित वक्त्यांचे विचार ऐकण्याची संधी

विद्यार्थी साहाय्यक समितीमध्ये यंदाही तीन दिवसांचा पर्यावरणपूरक गणेशोत्सव साजरा करण्यात आला. गणेशोत्सव म्हणजे ज्ञान, कला, संस्कार आणि एकतेचा उत्सव आहे. या परंपरेतूनच समितीत दरवर्षी या उत्सवादरम्यान विद्यार्थी विकास केंद्रातर्फे तीन दिवस ज्ञानसत्राचे आयोजन केले जाते.

अहिल्यानगर येथील मधुभाऊ चौधरी मुलींच्या वसतिगृहातही गणेशमूर्तीची प्रतिष्ठापना करण्यात आली होती.

यंदा समितीच्या वसतिगृहांमध्ये विद्यार्थ्यांची संख्या वाढल्याने डॉ. अच्युत शंकर आपटे वसतिगृह व मुलींचे नवीन वसतिगृह अशा दोन ठिकाणी ही व्याख्यानमाला झाली. मकरंद टिल्लू, मोनिका जोशी, स्वानंद गुधाते, प्रसाद चव्हाण आणि तनय लालवाणी, राजेंद्र उत्तूरकर यांचे स्टँड-अप कॉमेडी : एक कला, ड्रोन आणि नवकल्पना, मराठा आरमार- युनेस्को मान्यताप्राप्त १२ किल्ले, पु. ल. देशपांडे : कथारंग या विषयांवर व्याख्यान झाले.

अभ्यासाबरोबरच कला, संस्कृती व जीवनमूल्यांवर नवा दृष्टिकोन मिळवून देणारे ज्ञानसत्र ठरले. मेधावी वसतिगृहाच्या विद्यार्थिनी देखील या व्याख्यानमालेत सहभागी झाल्या होत्या.





### पर्यावरणपूरक, झिरो बजेट उत्सव

विद्यार्थी साहाय्यक समितीतील गणेशोत्सवाचे वैशिष्ट्य म्हणजे हा पर्यावरणपूरक, झिरो बजेट उत्सव असतो. गणेशमूर्तीसह संपूर्ण सजावट टाकाऊ किंवा उपलब्ध वस्तूंमधूनच केली जाते. महाराष्ट्रातील बारा किल्ल्यांना युनेस्कोने मान्यता दिली आहे. यंदाच्या गणेशोत्सवातील सजावट याच संकल्पनेवर आधारित आहे. विद्यार्थी- विद्यार्थिनींनी कागदा लगदा, पुठ्ठे, रांगोळी आणि इतर निरुपयोगी वस्तूंमधून केलेल्या सजावटीत गडकिल्ले साकारले आहेत.

## माजी विद्यार्थी मंडळाने गुंफले राखीच्या धाग्यात मायेचे नाते

शिक्षणासाठी पुण्यात आलेले विद्यार्थी रक्षाबंधनाकरीता घरी जाऊ शकत नाहीत, त्यांच्यासाठी समितीच्या माजी विद्यार्थी मंडळाच्या वतीने लजपत संकुल येथे रक्षाबंधनाचा कार्यक्रम आयोजित केला होता. कार्यक्रमासाठी समितीच्या माजी विद्यार्थिनी आणि कार्यकर्त्या सौ. मनीषा गोसावी, ॲड प्रार्थना सदावर्ते, अनिता देशपांडे, सुनंदा पाटील यांनी पुढाकार घेतला.

या कार्यक्रमात समितीच्या आजी आणि माजी विद्यार्थिनींनी लजपत संकुलातील मुलांचे औक्षण करून त्यांना राखी बांधली. विद्यार्थ्यांनी यावेळी सुरक्षा बंधन संकल्प प्रतिज्ञा केली. स्त्री संरक्षण, तिचा आदर आणि स्त्रीचे महत्त्व कायम टिकून राहावे व



ही जबाबदारी प्रत्येक भावाने घ्यावी, अशी ही प्रतिज्ञा होती. सुशील पुरी, जीवन बोधले यांनी मनोगत व्यक्त केले.

## परिचय सभेतून विद्यार्थ्यांना दिली समितीविषयी माहिती

समितीच्या वसतिगृहात प्रथमच प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांसाठी वसतिगृहनिहाय ४ ऑगस्टला परिचय सभा झाल्या. कार्यकर्ते दिनकर वैद्य, तुकाराम गायकवाड, ज्योती गोगटे, संजय अमृते, मेधा पंडित, सुप्रिया केळवकर, प्रभाकर पाटील, शुभांगी चिरपुटकर, तुषार रंजनकर, चंद्रकांत कुलकर्णी आदींनी या सभांमध्ये सहभागी होऊन विद्यार्थ्यांना समितीची स्थापना, उद्देश, ध्येय आणि मूल्यांची ओळख करून दिली. समितीतील तुमचा प्रवास आयुष्य बदलविणारा ठरेल, असे सांगितले.

यावर्षी प्रथमच विद्यार्थ्यांना समितीचा परिचय व्हावा, यासाठी तयार केलेल्या जडणघडण पुस्तिकेबाबत यावेळी सांगण्यात आले.

समितीमध्ये मिळत असणाऱ्या ग्रंथालय, संगणक कक्ष, लॅपटॉप लायब्ररी अशा सुविधांची माहिती दिली. त्याचबरोबर समितीच्या अनिवार्य असलेल्या योगासने, कमवा- शिका, रोज अर्धा तास श्रमप्रतिष्ठा, पाल्य- पालक योजन या मागचा उद्देश आणि त्याचा व्यक्तिमत्त्वावर होत जाणारा चांगला परिणाम याबद्दलही सांगितले. दिवाळी निधी ही संकल्पना कशी वेगळी आहे आणि यामध्ये विद्यार्थ्यांचा सहयोग किती महत्त्वाचा असतो याबद्दलही मार्गदर्शन करण्यात आले.

## कार्यशाळेत मुलामुलींनी घडविल्या ३६ गणेशमूर्ती

विद्यार्थी साहाय्यक समितीमध्ये २ व ३ ऑगस्ट रोजी गणेश मूर्ती तयार करण्याची दोन दिवसीय कार्यशाळा झाली. यात ६७ मुलामुलींना शिल्पकलेचा आनंद लुटला.

या कार्यशाळेत पहिल्या दिवशी २५ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. प्रसिद्ध मूर्तिकार सुभाष देशपांडे यांनी मातीपासून पर्यावरणपूरक गणेशमूर्ती कशी तयार करायची, हे अत्यंत सखोलपणे शिकविले. दुसऱ्या दिवशी सुभाष देशपांडे, हेमंत राजहंस, अनय देशपांडे, भूषण भालेराव, प्रज्ञा सातारकर व भाग्यश्री मॅडम यांच्या उपस्थितीत गणेश पूजन आणि घोषणांच्या साथीत कार्यशाळा सुरू झाली. या दिवशी ४२ मुली आणि २५ मुलांनी गणेशमूर्ती घडविण्याचा आनंद घेतला. एकमेकांच्या मदतीने एकूण ३६ मूर्ती घडविल्या. या मूर्ती पूर्ण वाळल्यानंतर १५ दिवसांनी रंगविण्यात आल्या. आचल भुते, देवयानी सोनावणे, पवन भोळसुरे, आकाश पाटेवार यांनी कार्यशाळेच्या आयोजनात सहभाग घेतला.



## नगरच्या जाधव वसतिगृहात मुलांचे उत्साहात स्वागत

विद्यार्थी साहाय्यक समितीच्या अहिल्यानगरमधील कल्याणराव जाधव मुलांच्या वसतिगृहात प्रवेश मिळालेल्या विद्यार्थ्यांचे उत्साहात स्वागत करण्यात आले.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून ‘सकाळ’च्या नगर आवृत्तीचे संपादक प्रकाश पाटील उपस्थित होते. समितीचे कार्यकर्ते, पर्यवेक्षक, मुलींच्या वसतिगृहातील विद्यार्थिनी यांनी विद्यार्थ्यांचे औक्षण करून, पुष्पगुच्छ देऊन मुलांचे स्वागत केले. प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना समितीचे हँडबुक आणि नोटबुक देण्यात आले. विद्यार्थ्यांच्या खोलीसमोर रांगोळी आणि फुलांनी सजावट केली सानिका झिंजाड यांनी केली होती.

रवींद्र देशपांडे यांनी समितीच्या कार्याची माहिती दिली. नंदकुमार देशपांडे यांनी प्रास्ताविक केले. प्रमुख पाहुण्यांचा सत्कार शिवाजी बोलभट यांनी केला. प्रकाश पाटील यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. सौ. सुनीता झिंजाड यानी आभार मानले. पर्यवेक्षक



कुंदन पठारे यांनी हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले. मुलींच्या वसतिगृहातील पर्यवेक्षिका सौ. विद्या सूर्यवंशी यावेळी उपस्थित होत्या.

## जागतिक भरारीसाठी ग्रामीण युवकांना नवे पंख

▶ पान १ वरून

मॅनेजमेंट, STAR मुलाखत, प्रगत रिझ्युमे, LinkedIn, पोर्टफोलिओ, ऑफर मूल्यांकन, प्रगत उद्योजकता, डिजिटल मार्केटिंग, नेटवर्किंग

विद्यार्थी क्लब्स आणि गटचर्चा- ग्रुप डिस्कशन (GD) कार्यक्रम सुरू झाले आहेत.

- **क्लब्स** - साहित्य, विज्ञान- तंत्रज्ञान, उद्योजकता, कला- संस्कृती, आरोग्य- क्रीडा
- **फायदे** - नेतृत्व, टीमवर्क, सृजनशीलता, समस्या सोडवण्याची क्षमता
- **गटचर्चा (GD)**- विचार मांडणे, ऐकणे, विश्लेषण करणे, संवाद कौशल्य वाढविणे
- **क्रियाकलाप** - वर्तमानविषय चर्चा, केस स्टडी, रोल प्ले, अभिप्राय
- **महत्त्व** - शैक्षणिक, सामाजिक आणि व्यावसायिक कौशल्यांचा सर्वांगीण विकास

विद्यार्थी विकास केंद्राची जबाबदारी यावर्षी डॉ. मकरंद फडके यांनी घेतली आहे तर डॉ. ज्योती गोगटे आणि सीमा होस्कोटे त्यांना सहकार्य करीत आहेत. विद्यार्थ्यांच्या समिती वास्तव्यात त्यांना समितीचे कार्य, उद्देश लक्षात यावेत म्हणून ‘जडणघडण’ ही पुस्तिका देण्यात येत आहे.

### सहकार्याची ताकद आणि शुभेच्छा

या कार्यक्रमाचा पाया म्हणजे समर्पित प्राध्यापक, व्यावसायिक आणि माजी विद्यार्थ्यांचे योगदान. हे सारे आपला वेळ, ज्ञान आणि अनुभव निःस्वार्थपणे देत असल्यामुळेच सत्रांचा दर्जा आणि विविधता उंचावली आहे. प्रत्येक वसतिगृहातील विद्यार्थी समन्वयक आणि विद्यार्थी प्रतिनिधी यांच्यामुळे कार्यक्रम सुकर व सुसंगतपणे पार पडतो.

या प्रवासात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणाऱ्या सर्व मार्गदर्शक, शिक्षक, माजी विद्यार्थी आणि कार्यकर्त्यांचे मनःपूर्वक आभार. त्यांच्या अथक परिश्रमामुळे हे विद्यार्थी फक्त शिक्षणातच नव्हे तर जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात सक्षम होतात.

विद्यार्थ्यांनो, तुमच्या स्वप्नांच्या पाठीशी आम्ही सदैव उभे आहोत. तुमचे ध्येय प्रस्थापित करा, आत्मविश्वास बाळगा आणि समाजासाठी जबाबदार नागरिक म्हणून पुढे चला. विद्यार्थी साहाय्यक समितीची ही सामाजिक जबाबदारी आहे, की आपण पुढील पिढीला सशक्त, सक्षम आणि मूल्यनिष्ठ बनवून भारताच्या उज्ज्वल भविष्यासाठी तयार करणे. तुमच्या प्रत्येक यशात समितीची आनंदाची भावना आहे. तुमच्या उज्ज्वल भविष्यासाठी हृदयपूर्वक शुभेच्छा!




*एचएनबी कंपनीकडून नवीन वसतिगृहातील दोन खोल्यांकरीता (२२५, २२६) देणगी देण्यात आली आहे. या खोल्याच्या उद्घाटन प्रसंगी उपस्थित कंपनीचे श्री. असित जैन व श्री. राऊत. यावेळी समितीचे कार्यकर्ते, कर्मचारी व विद्यार्थिनी उपस्थित होत्या.*